# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक २१/०३/२०२५ (शुक्रवार) सकाळ

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ६१ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त ,भिवापुर पोलीसांची कारवाई

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक २०/०३/२०२५ रोजी भिवापुर पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग असतांना त्यांना गुप्त बातमीदारामार्फतीने अवैध रेती वाहतुक बाबत खात्रीशिर माहीती प्राप्त झाली त्यानुसार भिवापुर पोलीसांनी खालील प्रमाणे दोन करावाई केल्या.

१. पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान बाजारसमिती येथे **ट्रक वाहन क्र एम एच ४९ सी झेड ४८४८ हा** संशयीत रित्या जाताना मिळुन आला संशयीत ट्रकला पोलीसांनी थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती मिळुन आली. वाहन चालक याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **प्रणित गौतम मेश्राम, वय २६ वर्ष, रा. भिलेवाडा पोस्ट कारधा, जि.भंडारा** असे सांगितले. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच रेतीची वाहतुक वाहन मालक **समीर खान अब्दुल गफार खान रा. तुमडी मोहल्ला इतवारी, नागपुर**,याच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले.तसेच सदर रेती ही बेळाघाट,ब्रम्हपुरी घाट येथुन एका व्यक्ती कडुन आणण्याबाबत माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती आणि २) ट्रक क्रमांक एम.एच ४९ सी झेड ४८४८ **असा एकुण ३०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

२. पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान तास कॉलनी,स्वरूप बार जवळ **ट्रक वाहन क्र एम एच ४९ बी झेड ४७४४ या** संशयीत रित्या जाताना मिळुन आला. ट्रकला पोलीसांनी थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती मिळुन आली. वाहन चालक याला

नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **श्याम मारोती गाडेकर, वय ३४ वर्ष, रा. शिवछत्रपती नगर, न्यु कामठी नागपुर** असे सांगितले.त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले.ट्रक मालकाचे नाव **शुभम शेन्डे रा. कामठी नागपुर** असे सांगितले.तसेच सदर रेती ही बेळाघाट,ब्रम्हपुरी घाट येथुन एका व्यक्ती कडुन आणण्याबाबत माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती आणि २) ट्रक क्रमांक **एम एच ४९ बी झेड ४७४४ असा एकुण ३०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. दोन्ही कारवाई मध्ये ६१,००,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**ट्रक वाहन क्र एम एच ४९ सी झेड ४८४८** चा चालक ,मालक आणि एक अज्ञात आरोपी तसेच **एम एच ४९ बी झेड ४७४४** चा चालक ,मालक आणि एक अज्ञात आरोपी **यांच्या** विरूध्द पोस्टे भिवापुर येथे **कलम ३०३(२),४९,३(५) भा.न्या. सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान,सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये दो गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक २०/०३/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलींग असतांना ईसापुर कन्हान नदीच्या पात्रात ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४० सी.ए ७८१६ हे संशयीत रित्या घाटावर मिळुन आले. पोलीसांनी वाहनाजवळ जावुन तपासणी केली असता त्यात रेती मिळुन आली. वाहन चालक किशोर राजेंद्र वैदय, वय ३०वर्षे , रा देहेगाव जोशी वार्ड नं ०१ हा मिळुन आल्याने त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. पोलीसांनी घटनास्थळावरून आरोपीच्या ताब्यातुन १) एम एच ४० सी.ए ७८१६ आणि १ ब्रास रेती असा **एकुण ०५,०४,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.** .

**आरोपी किशोर राजेंद्र वैदय, वय ३०वर्षे , रा दहेगाव जोशी वार्ड नं ०१** यांच्या विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं ४८(७), ४८(८) म.ज.म.सं सहक ४ २१ खाण आणि खनिज (नियमन आणि विकास),३ सा.सं.नु प्रतिबंधक, १५ पर्यावरण (संरक्षण)अधिनियम सहकलम ५०, १७७ मोवाका **अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## अपधातात मृत्यु पावलेल्या पोलीस अंमलदाराच्या परीवाराला वेतन विमा सहायता निधीतुन मिळाले १ कोटी रूपये.

नागपुर ग्रामीण जिल्हयात कार्यरत असलेले पोलीस अंमलदार इश्वर शिवाजी काळे हे मुळचे छत्रपती संभाजी नगर जिल्हयाचे रहीवासी होते. दिनांक जुन २०२४ रोजी त्यांचा वडोदा बाजार, जि. छत्रपती संभाजी नगर येथे रस्ते अपघातात मृत्यु झाला होता. मृतक इश्वर शिवाजी काळे रा. यांच्या परीवाराला सहाय्यता करण्यासाठी नागपुर ग्रामीण पोलीस दल आणि एच.डी.एफ.सी बॅक यांनी एकत्रित पाउल उचलुन दिनांक २०/०३/२०२५ रोजी पोलीस भवन येथे एच.डी.एफ.सी बॅकेकडुन १ कोटी रूपयांचा वेतन विमा सहायता निधी चा धानादेश मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या हस्ते मृतक इश्वर शिवाजी काळे यांच्या परीवाराला प्रदान करण्यात आला आहे.सदर वेळी एच.डी.एफ.सी बॅकेचे अधिकारी हजर होते.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर